## 'आयुर्वेद ही एक नित्यनूतन प्रेरक जीवनशक्ती आहे'

**$2^{nd}$ world congress of ayurveda 2006** च्या निमित्ताने आपल्यासाठी उपलब्ध होत आहे...

**सर्वप्रथम भारतात लिहिला गेलेला सैध्दान्तिक ग्रंथ**

**The first unparalleled, exceptional & revolutionary book in the field of Arts, Medical Science, Social Health & Culture.**

# K a l a y u r v e d a

# © क ला यु र्वे द

**लेखक- डॉ. दिग्विजय वैद्य 'सार्थक', पुणे**

**मूळ किंमत- रु. 225/- (रु.दोनशे पंचवीस मात्र)**

***दि. 5 ते 12 नोव्हें. 2006 पर्यंत खास सवलतीच्या किंमतीत उपलब्ध***

**प्रकाशक- अभिनवभारती कलाप्रकाशन,**
**५, वृंदावन अपार्टमेंटस्, गणगोटे पथ, पुणे ४११ ००४**
**फोन : २५६७३३२९ मो. ९४२३५७७०२९**

**पुस्तकाविषयी काही महत्त्वाचे**

1) वैद्यकशास्त्रानुसार कलेच्या अनुभवाचा शोध, 2) कलेच्या अनुभवाच्या बाजूने वैद्यकशास्त्राकडे पहाणे, 3) आयुर्वेद तथा अन्य वैद्यकविचार, भारतीय वेद-उपनिषदे यांतील तत्वज्ञान, योग सांख्य व्याकरण इ. वेदांगे, सामाजिक शास्त्रे, शैक्षणिक विचार, सांस्कृतिक परिशीलन, ऐतिहासिक -वाङ्मयीन संशोधन, भारतीय काव्यसाहित्य आणि कलाविषयक शास्त्रीय विचार, कलासमीक्षा, कलांमधील प्रात्यक्षिक आणि अध्ययन-रियाज-मनन चिंतन-सादरीकरण- अध्यापन अशा अनेकानेक बाजूंची दखल घेत त्या त्या विषयांतील महत्वाचे ग्रंथ आणि ज्ञानवृद्ध सन्माननीय व्यक्ती यांच्याशी संवाद घडून लिहिला गेलेला विषय. 4) कलाप्रकृतिलक्षण, कालपरिमाण-ऋतुचर्या-आयुर्मानविभाग, धातुकल्पना-क्रियान्वय, प्रातिभ संनिकर्षण आणि कलाप्राकृतिक भूताधिक्य इ., भूताधिकार विभक्ति प्रवृत्त्यांतर-वाच्यस्थिरताा इ., व्याधिविनिश्चयदृष्टि, जीवशारीर चेतना, सारप्रकृति-कलाप्रकृति, व्याधि-स्थान असे आठ अध्याय, सर्व मिळून एकूण सुमारे सातशे सूत्रांमधे मांडला गेलेला व्यापक विषय, 5) आयुर्वेदातील ज्ञानवृद्धांपासून ते आधुनिक पिढीच्या 'वैद्यां'नी आणि कलावंतांनी आयुर्वेदाचे नव्या युगातले एक नवे पाऊल म्हणून गौरवलेला विषय (काही निवडक अभिप्राय या पुस्तिकेत समाविष्ट).

# Know about the Author : Dr. Digvijay Vaidya

Born on 27 October 1956, Dr. Digvijay Vaidya did his MA, M.Phil. (Marathi) from Pune University. He has a doctorate (Sangitacharya) in music from 'Akhil Bharatiya Gandharva Mahavidyalaya Mandal' (Mumbai-Miraj) that was established in 1901 by Pt. Vishnu Digambar Paluskar. He has learnt Indian Classical music from eminent and renowned Gurus of Gwalior, Agra, and Jaipur 'Gharanas'.

He is a professional musician-singer of Hindusthani music and is a staff artist of Akashwani, Pune. He has held musical concerts in Maharashtra, in other states of India and even abroad. He is a renowned Guru in Pune in this field. He also had a stint as a lecturer of Marathi and music in reputed colleges like Fergusson college, SNDT College, Lalit Kala Kendra of Pune University, and Arts and Commerce college, Lonavala. For his personality development he has studied drawing, sculpture, dramatics, literature and other Arts and also making of musical instruments under several Gurus.

He has a rich library of his own with 10,000 books, about 350 files containing documents and cuttings, approximately 4500 gramophone records, 1200 cassettes, 250 spools and over 500 CDs. He had been editor of the magazine 'Sangit Kala Vihar' (1999-2001) and that of 'Abhinav Kala Masik Patrika' (2001-2004). He has been a writer and a critic in the field of literature and music. He guides in research projects, makes reference material available, interacts with intellectuals and also delivers lectures as a guest speaker.

## जिज्ञासू रसिकांसाठी... पुस्तक वाचताना...

पहिल्याने पुस्तक नुसते चाळून पहा. जिथे सहज लक्ष जाईल तिथे थोडं थांबून वाचून पहा. विषयाची थोडी जाणीव नक्कीच होईल. त्यानंतर टीपा व विवरण हा भाग एकदा सलग वाचा. त्यातून विषयाची कल्पना येईल. मग प्रस्तावना वाचा, व्यक्ती आणि संदर्भ ग्रंथांची सूचि वाचा. अनुक्रमणिका पहा. त्यातून विषयाची व्याप्ती काहीशी लक्षात येईल. त्यानंतर मग आपल्याला ज्या कलेची आवड असेल त्या दृष्टीने पूर्ण लक्ष केंद्रित करून सर्व सूत्रे वाचा. त्यातून विषयाचे विकसन लक्षात येईल आणि मग सलग पुस्तक अध्यायश: - सूत्रे आणि टीपा व विवरण यासह वाचा. अशा वाचनाने आपल्या सहज लक्षात येईल की विषय समजणे मुळीच अशक्य नाही. (अवघड भासला तरी तो तसा नाही उलट) सूत्रांनुसार विषयक्रमही लक्षात येतो, शब्दप्रयोग आणि त्यांचे औचित्य, त्यांची यथार्थता हे सर्व व्यवस्थित समजते आणि पुस्तक आपल्यासाठी आहे, हे सहज लक्षात येते.

**- एक रसिक वाचक**

***विशेष ऋणनिर्देश***

*डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. व्ही.व्ही. डोईफोडे, वैद्य प.य. वैद्य खडीवाले,*
*डॉ. दिलीप कुलकर्णी, डॉ. राजेंद्र देशपांडे*

## 'KALAYURVEDA'

### Interdisciplinary manifestation of Ayurveda in Performing Arts

We derive pleasure and happiness from some art form or the other, may be music, drawing, sculpture, dramatics, or literature; depending on our lifestyle and expect to maintain good health through its experience. These days several therapies (e.g. music therapy) are being adopted. There is an endeavour to obtain some physical effects. Still, majority of people endorse the view that an art form has an effect mainly at the mental level. Is the effect of an art purely at mental level? The categorical reply is 'NO'. Why it is so?

It should be understood that for an artist while creating an art form, there is an inspiration for a significant, conscious framework. However, more importantly, for revelation and imparting a real form to that conscious thinking, the artist is required to perform several physical processes. Otherwise, it is not possible to transform and project the vision and the actual art form, which can be sensed by our sensory organs.

Yet another important aspect that comes up here is that the use of senses like speech and touch are essential in life, in absence of which life is not tenable. However, even before inspiration of an art form, one starts experiencing some subtle new sensations. Consequently, the art form is presented, which in turn is experienced through listening and/or observing. Thus real life needs sensory organs ( Indriyarth) and the sensory organs need fine arts. So, it would be appropriate to say that in an artist's constitution, there exists a system (Vastavika) related to sensory organs for normal functioning and yet another simultaneous and parallel system ( Prativastavikata) for creativity, (as identified in Kalayurveda) both functioning side by side. This in itself is uniqueness of an artist and a natural process as well...

...Due to such complexities in this 'Kala Prakruti', arising out of different constitutions and processes; the systems, reasons and nature of a disease could be diagnosed by jointly considering ' Vastavika' and 'Prativastavika' modes. If one wants to look upon the practical of treatment, then the artist's exceptional constitution for 'Vastavika' can be considered as 'Sara Prakruti' and 'Prativastavika' as 'Pravrutyantarit Prakruti'. Here, for 'Adan kala ' , 'Niti laxi Bhavashrayi' and for 'Visarg kala', 'Vartanlaxi karyashrayi' diagnosis and treatment is imperative.

I can certainly say that this subject is based on both the basic theories of Ayurveda, comprising of knowledge of logical analysis of systems and the science of actual diagnosis and treatment. Still, if equal importance is given to the physical and mental experience from the field of fine arts, in this context, then a new dimension will be added to the science and knowledge of medicine. It culminates in the treatise - ' Kalayurveda'. The aim of this treatise is protection of good health and eradication of ailments for artists working in the field of fine arts and society.

It is impossible to discuss/present the entire book in the limited time or palce. Still, I have endeavoured to call attention of representatives of inquisitive medical fraternity. Here the reader might have noticed several shortcomings in this shortest note for which I may please be excused. Thank you.

**Dr. Digvijay Vaidya.**

## एका अलक्षित कठीण विषयावरील अभिनव शास्त्रीय ग्रंथ 'कलायुर्वेद'

कलायुर्वेद हे पुस्तक मी साद्यंत वाचलं आणि आयुर्वेदाच्या दृष्टीनं, कलेच्या दृष्टीनं मला ते अतिशय आवडलं. असा एखादा दुर्लक्षित, उपेक्षित, कठीण विषय लोकांना समजायला कठीण जातो. पण लेखकाने अत्यंत प्रयत्नपूर्वक विषयाची मांडणी चांगली केली आहे. त्याला अनुभवाचं पाठबळ आहे.

कलेचे म्हणजे कलानिर्मिती करणाऱ्या कलाकाराचे व त्या कलाकृतीचा आस्वाद घेणाऱ्या आस्वादकाचे स्वास्थ्य - अस्वास्थ्य यांचा निर्मितीवर आणि आस्वादक्रियेवर होणारा परिणाम व त्यांची लक्षणे - हा प्रस्तुत ग्रंथातील प्रतिपाद्य विषय. यादृष्टीने संवेदनायोगाचा मानसवर्तनाशी व प्राणशक्तीचा शरीराशी असलेला संबंध दर्शविणे आणि प्रत्यक्ष व्यवहारात हे दोन योग वेगळे रहात नाहीत हे सांगणेही चांगलेच मार्मिक आहे. रस व आनंद यांची जाणीव स्थलकालदृष्ट्या अवर्णनीय असली तरी ती निश्चित जाणवते हे निरीक्षण मौलिक आहे. 'सत्वमात्मा शरीरं च... वेदोऽयं संप्रकाशित:॥' या वैद्यकातील वचनाचा याला आधार आहे.

कलेच्या ग्रहणाच्या अवस्थेत प्राणशक्तीचा, संवेदनाच्या अवस्थेत संवेदनशक्तीचा योग लक्ष्य असतो तर सृजनाच्या अवस्थेत ग्रहण व संवेदन यांचे एकात्म कलाप्रात्यक्षिक लक्ष्य असते आणि याचा आदान - विसर्ग कालाशी प्राकृतिक संबंध असतो हे म्हणणेही मोलाचे आहे. तसेच कलेतील आणि वैद्यकातील रस त्यांचे गुण यांची तुलना करून पहाण्यासारखी आहे हे विवेचनही चांगले झाले आहे.

कलेची निर्मिती व आस्वाद या दोनही घटकांमधे कालतत्त्वाचा संबंध असतो व तो 'निमेष - काष्ठा ते दिवस' येथपर्यंत; तसेच या संदर्भात निरनिराळ्या ऋतूंचा म्हणजेच कालमानाचा विचार स्वास्थ्य-अस्वास्थ्याच्या दृष्टीने करणे; प्रतिभेचे संनिकर्षण आणि प्रकृतिसंस्थापक कार्य, त्याची परिणती आणि शेवटी व्याधिविनिश्चयदृष्टी व व्याधिस्थान हे सर्व विवेचन अत्यंत मार्मिक असून लेखकाच्या मूलग्राही स्वतंत्र अभ्यासाचेच फलित आहे.

आता हे पुस्तक विद्यापीठांकडे पोचलं पाहिजे. म्हणजे मग जे यातले तज्ञ आहेत, या विशिष्ट शाखेचे तज्ञ आहेत, त्यांच्याकडून याचं मूल्यमापन होईलच; पण त्यांना या विषयाची मदतही होईल; जे अशा विषयात स्वारस्य घेऊ इच्छित असतील त्यांना दिशा मिळेल, त्यांना सांगता सांगता यातला अभ्यासही वाढीस लागेल.

सारांश, एक अभिनव व अलक्षित विषय - अभिनव पण शास्त्रीय, तर्कसुसंगत रीतीने, विशेष म्हणजे साधार आणि सोदाहरण मांडून दाखविण्यात लेखक यशस्वी झाला आहे हे निर्विवाद! त्याबद्दल तो धन्यवादास पात्र आहे!

**वैद्य श्रीनिवासशास्त्री पु. हिर्लेकर** (अमरावती)

अखिल भारतीय पातळीवरील आयुर्वेदक्षेत्रातील अत्यंत सन्माननीय वयोवृद्ध ज्ञानवृद्धांपैकी एक,
संस्कृत पंडित आणि कवी, भारतीय परंपरेतील एक वेदान्ती-शास्त्री.

# कलाकारांच्या आयुष्यातील एक नवी पहाट ‘कलायुर्वेद ’

कलायुर्वेद हा; मूळ आयुर्वेद जो आपल्याला वैद्यकविषयक विचार सागंतो त्याच्याशी अत्यंत जवळचा पण एक वेगळ्या प्रकारे केलेला शास्त्रीय विचार आहे.

आतापर्यंत निरनिराळ्या प्रांतात वैद्यकशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग कसा करता येईल यावर चर्चा चालू आहेत. प्राधान्याने अगदी अलीकडे स्पोर्टसमेडिसिन या प्रकारातही आयुर्वेदाची भूमिका काय आहे याबद्दलही अनेक वैद्यांनी वेगवेगळ्या परिषदांमधे आपले संशोधन-विचार मांडलेले आहेत .

या क्रीडाप्रकारांच्या बरोबरीने आपलं आयुष्य किंवा जीवन समृध्द करण्यासाठी आणखी एका गोष्टीची गरज असते ती म्हणजे संगीत,चित्र,शिल्प,नाट्य,साहित्य इत्यादी कलांच्या आस्वादाची. या एकूण कलाप्रांतामधे आयुर्वेदाच्या संदर्भात काही वेगळेपणा आहे का? काही वेगळा विचार करता येईल का? या मूलभूत संकल्पनेतून डॉ. दिग्विजय वैद्य यांनी कलायुर्वेद या ग्रंथाच्या आधाराने एका नवीन क्रान्तिकारक विचाराची मांडणी केली आहे. क्रान्तिकारक असं मी एवढ्यासाठी म्हणतो की आतापर्यंत आयुर्वेदशास्त्रातल्या शास्त्रज्ञांनी वैद्यजनांनी प्रकृतिविचार हा जाणीवपूर्वक तपशीलाने हाताळला होताच.परंतु या संगीत, चित्र इ. कलांसारख्या विशिष्ट आणि महत्वपूर्ण प्रांतातील व्यक्तींची प्राकृतिक ओळख या दृष्टीने ऊहापोह झालेला नव्हता याचं एक कारण असंही असू शकेल की प्रत्येक डॉक्टर किंवा वैद्य हा या विभिन्न कलांमधे पारंगत असेलच असंही नाही आणि जे कलावंत आहेत त्यांना वैद्यकशास्त्रातली जाण असेल असंही नाही. परंतु डॉ. दिग्विजय वैद्य हे मुळातच संगीतातले उच्चश्रेणीचे गायक कलावंत आहेत, त्यामुळे संगीताची आणि त्याचबरोबर विशेष म्हणजे इतर कलांविषयीची त्यांची जाणही अशीच उच्चश्रेणीची-पातळीची तर आहेच. परंतु याशिवाय त्यांनी आपला पिढीजात वैद्यकीय अनुवंशिक गुण आणि नात्यातल्या, जवळच्या अनेक डॉक्टर्स, वैद्य यांच्या संदर्भाचा एक चांगला लाभ घेऊन आयुर्वेदाचासुध्दा अतिशय जाणीवपूर्वक तपशीलाने अभ्यास करून या आयुर्वेदातल्या शास्त्रीय ज्ञानाचा आणि कलाक्षेत्राचा काही मेळ घालता येईल का? याचा यशस्वी विचार केलेला आहे. या संदर्भात त्यांनी या लेखनाला सुरूवात केली तेव्हापासूनचा मीही एक प्रत्यक्षदर्शी रसिक आहे. म्हणून जेव्हा या ग्रंथाची निर्मिती झाली तेव्हा मला अतिशय मनापासून आनंद झाला.

मी स्वत: शारीरक्रियाविज्ञान हा विषय गेली अनेक वर्षे आयुर्वेद कॉलेजमधे शिकवतो आहे. त्याचप्रमाणे आयुर्वेदप्रसारक अशा अनेक प्रकल्पांच्या निमित्ताने परदेशी जाण्याचा योगही येत असतो.अर्थात प्रकृति हा माझ्या मूलभूत अभ्यासाचाही विषय आहे. तेव्हा, कलाकारांमधेसुध्दा वात, पित, कफ याच्यांबाबतीत काही वेगळेपणा असू शकतो ही गोष्ट प्रथम या ग्रंथामुळे अतिशय नेमकेपणाने व्यक्त झाली आहे याचं मला आयुर्वेदाच्या दृष्टीने एक विशेष महत्व वाटतं. नाट्यशास्त्राच्या रससिध्दान्ताचा सर्व कलांच्या दृष्टीने एक नवा प्राकृतिक अन्वयार्थ त्यांनी व्यक्त केला आहे व त्यानुसार आयुर्वेदाच्या शास्त्रीयतेच्या आधारे कलाकाराचं जे वेगळेपण असंत त्याला ‘कलाप्रकृति’ असं म्हणता येईल अशी एक निश्चित मांडणी डॉ. दिग्विजय वैद्यांनी केली आहे. म्हणून या सर्व विचाराला ‘कलायुर्वेद’ असं म्हणणं हे योग्यच आहे आणि आयुर्वेदाच्या विचाराप्रमाणे कलांवताचं स्वास्थ्यरक्षण आणि अस्वास्थ्यनिवारण हे या ग्रंथाचं एक महत्वाचं सामाजिक फलित ठरावं असं मला वाटतं .

आयुर्वेदामधे 'असात्मेंद्रियार्थसंयोग', 'प्रज्ञापराध' आणि 'कालपरिणाम' ही आम्ही आजाराच्या निर्मितीची प्रमुख कारणे मानतो. पण हेच शब्दप्रयोग डॉ.वैद्य यांनी कलाकारांच्या स्वास्थ्याच्या संदर्भात घेऊन 'सात्मेंद्रियार्थसंयोग' 'प्रज्ञाप्रकाश' आणि 'कालबोध' असे एक सकारात्मक गृहीतही सिध्द केले आहे. अलीकडे ज्याला आपण ॲप्टीट्यूड टेस्ट वगैरे म्हणतो त्याचाही सुसंगत विचार इथे झाला आहे.

विशेषत: पाचव्या अध्यायात एक फार महत्वाचा, मोठा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. मला असं वाटतं की तो एक तत्वज्ञानात्मक प्रश्न आहे की 'कलावंतानं काय महत्वाचं मानावं? जगण्यासाठी स्वास्थ्य की स्वास्थ्यासाठी जगणं?'- या प्रश्नाचं जे मौलिक सैध्दान्तिक उत्तर त्यांनी अतिशय सोप्या भाषेत मांडलं आहे ते मुळातून वाचण्यासारखंच आहे.

'कलायुर्वेद' ही एक नवी दिशा आहे, एक नवा विचार आहे, नवी बैठक आहे; त्यामुळे निश्चितपणे एक आयुर्वेदशास्त्रामधे तर भर पडलेलीच आहे; पण ,या 'कलायुर्वेदा'च्या मार्गदर्शनाने कलाकारांच्या आयुष्यातही एक नवी पहाट उगवेल असा मला विश्वास वाटतो!

**डॉ. राजेन्द्र देशपांडे**

आयुर्वेद कॉलेज आकुर्डी (पुण्याजवळ) येथील 'शारीरक्रियाविज्ञान' विषयाचे प्राध्यापक,
नाट्यक्षेत्राचे रसिक.

## दिग्विजय 'वैद्य' यांचे मन:पूर्वक अभिनंदन

श्री. दिग्विजय वैद्य यांचे 'कलायुर्वेद' पुस्तकाविषयी लिहीताना मला अत्यंत आनंद होत आहे. एका अत्यंत वेगळ्याच विषयाची त्यांनी यशस्वीपणे हाताळणी केली आहे. कायचिकित्सा, बालरोगचिकित्सा इत्यादी आयुर्वेदाच्या आठ अंगामधे कलाकारांसबधी आयुर्वेद अशी एक नवीनच भर त्यांनी टाकली आहे. एक माणूस किंवा व्यक्ती म्हणून कलाकारामध्ये निश्चितच वेगळेपण आहे. विशेषत: 'प्रतिभा' हा तर कलाकारांचा 'प्राण' किंवा 'आत्माच' आहे. अशा स्थितीत आयुर्वेदाच्या दृष्टीकोनातून त्याचे विश्लेषण, विवेचन करणे ही अवघड गोष्ट आहे. ते साधण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय आहे.

मी स्वत:टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा आयुर्वेदीय त्रिस्कंधकोश या संशोधन प्रकल्पात सन १९८९ पासून संशोधक म्हणून कार्यरत आहे. त्यातून आजपर्यंत लक्षणकोश आणि हेतुकोश प्रकाशित झालेले असून त्यावर आधारीत **'AYUTA NIDANA'** हे **Ayurvedic Diagnostic Software** विकसित झालेले आहे. कलाकारासाठी आवश्यक अशा प्रतिभा,वर्ण,स्वर इ.अनेक विषयाची माहिती चरक,सुश्रुत,वाग्भट यांचे मूळ ग्रंथातून या ठिकाणी संकलित झालेली आहे.कलायुर्वेद मध्ये या माहितीचा निश्चितच फायदा होईल. आयुर्वेद क्षेत्रातील कलाप्रेमी किंवा कलावंत व्यक्ती श्री.दिग्विजय वैद्य यांना मदत करू शकतील. आपले 'वैद्य' हे आडनाव सार्थ केल्याबद्दल श्री.दिग्विजय वैद्य यांचे अभिनंदन करून मी त्यांना त्यांचे कार्यात शुभेच्छा देतो.

**वैद्य दि. प्र. गाडगीळ**

आयुर्वेद विभागप्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

## ‘कलायुर्वेद’ एक अभ्यसनीय ग्रंथ

आयुर्वेद व वनस्पती क्षेत्रातील अनेक जाणकार मंडळीचे माझ्यावर व आमच्या वैद्यक -संशोधन संस्थेवर अपार प्रेम आहे. अनेक पुस्तके परिक्षणार्थ येतात. काही पुस्तके आपली कसोटी पाहातात. असेच एक वैद्यकीय पुस्तक श्री.दिग्विजय वैद्य यांनी पाठविले. ते मी पुन: पुन्हा प्रामाणिकपणे वाचले. अनेकशास्त्रपारंगत व चौसष्ट कलापारंगतांपैकी मी नव्हे, पण अनेक कलाकारांच्या संगतीचा मी लाभ घेतलेला आहे. कलायुर्वेद हा ग्रंथ वरवर पाहता वाचायला अवघड आहे. (मला इथे आठवण येते अष्टांगहृदय सूत्रस्थान अध्याय १६ मधील दोषांचे आवरण परिणाम यांच्या श्लोकांच्या अभ्यासाची) तरीपण ज्यांना आयुर्वेदासारख्या चिकित्साशास्त्रात प्राविण्य मिळवायचे आहे, व्यक्तीनुरूप चिकित्सा करायची आहे, त्यांनी अशा ग्रंथाच्या आधाराने कला या माध्यमाचा अभ्यास करायलाच हवा. आपण नेहमी प्रत्येक व्यक्तिमत्व स्वतंत्र आहे असे समजतो, प्रत्येकाची फ्रीक्वेन्सी वेगळी असते, प्रत्येकाची स्वतंत्र नादलहरी असते या दृष्टीने. आता पुस्तकाच्या पृष्ठसंख्येस मर्यादा असल्यामुळे व विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे सर्वच विषयांचा अर्थबोध व्हायला कदाचित वेळही लागेल पण पुस्तक अभ्याकांसाठी वाचनीय आहे मनन करण्यासारखे आहे. इंद्रियार्थांची नवता-तदर्थ शारीरक्रिया आणि धातुविचार चांगला मांडला गेला आहे. कलाइच्छेस शारीरबल, कलाक्रियेस मनोबल आणि कलाज्ञानास प्रतिमेचे योगबल ही मांडणी; तसेच निदान व चिकित्सेच्या दृष्टीने ६वा - व्याधिविनिश्चयदृष्टिकोन आणि ८वा व्याधिस्थान निदान हे अध्याय आयुर्वेदाच्या अभ्यासकांनी अभ्यासण्यासारखेच आहेत. डॉ.दिग्विजय वैद्य ऊर्फ ‘सार्थक’ यांना भावी आयुष्यातील वाटचालीकरता शुभेच्छा!

**वैद्य प. य. वैद्य खडीवाले**

अखिल भारतीय पातळीवरील आयुर्वेदक्षेत्रातील एक अत्यंत सन्माननीय ज्ञानकार्यकुशल व्यक्तिमत्व.

## वैद्यकशास्त्र आणि कलाक्षेत्र यांसाठी महत्वपूर्ण ठरणारा ‘कलायुर्वेद’

डॉ. दिग्विजय वैद्य ‘सार्थक’ यांनी लिहिलेल्या ‘कलायुर्वेद’ या एका अप्रतिम ग्रंथाबद्दल वाचकांना उद्देशून सांगताना मला विशेष आनंद होतो आहे.

पुस्तकाचे वाचन सुरु असतानाच ठिकठिकाणी डॉ. वैद्य यांचा अभ्यास, व्यासंग व मराठी भाषेचे शब्दसौष्ठव यांचा निश्चित प्रत्यय येत रहातो.

आयुर्वेद: आयुष: वेद: । आयुर्वेद हे शास्त्र अतिप्राचीन भारतीय चिकित्साशास्त्र आहे. मनुष्याच्या शारीरमानस स्वास्थ्याचा सर्वांगीण विचार आयुर्वेदशास्त्र करते. स्वस्थ व्यक्तीच्या स्वास्थ्याचे रक्षण करणे आणि आजारी व्यक्तींच्या व्याधींचे निराकरण करणे हे आयुर्वेदाचे उद्दीष्ट. यादृष्टीने डॉ. वैद्य यांनी या ग्रंथात कलाकारास केंद्रस्थानी मानून केलेला कला (संगीत / चित्र / शिल्प / नाट्य / साहित्य), त्यांचे व्यक्तीकरण (अभिव्यक्ती, सादरीकरण) करताना होणारे शारीरिक व मानसिक बदल; वात, पित्त, कफ इ. प्रकृति यांमधे होणारे बदल यांचा उहापोह, त्याबद्दल लेखकाचे स्वत:चे असे खास अभ्यासपूर्ण मत, आणि एकूणच सर्व विवेचन अत्यंत प्रभावी झाले आहे.

हे सर्व ज्ञानविषयक (सैद्धान्तिक) विचार मांडण्याची पद्धतही थेट आयुर्वेदोक्त पारंपारिक ग्रंथाप्रमाणे केलेली आहे हे विशेष. त्यानुसार आठ अध्यायांत सर्व ज्ञानसार सूत्ररुपात सांगितले आहे. पहिल्याच अध्यायात सांगितलेली कलायुर्वेदाची गृहीत तत्त्वेही विषयाचा आवाका समर्थपणे स्पष्ट करतात.

आयुर्वेदातील प्रकृती संकल्पनेचा विचार कलायुर्वेदाच्या दृष्टीने 'स्थायीरसप्रकृति' म्हणून येतो. दोष, सप्तधातु, आशय, (मांसधरा इ.) कला, स्रोतसे, मर्मे, आदान - विसर्गकाल, पंचमहाभूते, असात्मेंद्रियार्थसंयोग, प्रज्ञापराध, कालपरिणाम या सर्व आयुर्वेदोक्त ज्ञानाचा 'कला (संगीत/शिल्प इ.)' या दृष्टिकोनातून पूर्णत: नवा व थोडासा धाडसी विचार डॉ. वैद्य अतिशय तर्कसंगत, शास्त्रीय पद्धतीने आपल्यासमोर मांडतात तेव्हा त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

प्रतिभा हा 'ओज' या आठव्या धातुनंतरचा नववा धातु कलाप्रकृति करता मानावा हा त्यांचा विचार पूर्णत: नवीन आणि विचारांना चालना देणारा आहे. अर्थात सर्वच सूत्रे वाचकाला त्यावर चिंतन करण्यास प्रवृत्त करणारी आहेत. आयुर्वेदिक व्यधिविचाराप्रमाणे कलाकाराच्या कलानिर्मितीत (त्या प्रसंगी) निर्माण होणारे अस्वास्थ्यकारच बदल इ. त्यांचे निदान हा भाग खूपच रोचक व माहितीच्या दृष्टीने वाचकांना अचंबित करणारा आहे.

या पुस्तकाचे वाचन केवळ एकवेळ करून पुरेसे नसून त्याची जेवढी 'पारायणे' केली जातील तेवढा विषय जास्तीत जास्त सखोलरीत्या समजायला मदत होते असा मला स्वानुभव आहे. डॉ. वैद्यांना एकच विनंती करु इच्छितो की, पुस्तकात सूत्रांचे विवेचन करताना त्यांनी प्रत्यक्षातील कलाकारांची उदाहरणे दिल्यास तो विषय समजण्यास अधिक सोपे जाईल.

डॉ. वैद्य यांनी हे पुस्तक लिहून कलाकारांना व कलाप्रेमींना एक नवा विचार, नवा मार्ग दाखवला आहे याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि हा 'कलायुर्वेद' जास्तीत जास्त वैद्य, डॉक्टर्स आणि कलाकारांपर्यंत पोचावा अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

**डॉ. वैद्य संजीवन दिवेकर**
तरुण पिढीपैकी एक प्रख्यात नाडीपरीक्षक आणि व्यावसायिक आयुर्वेद चिकित्सक,
भारतीय संगीताचे अभ्यासक.

## वैद्यकशास्त्राची एक नवी दिशा 'कलायुर्वेद'

कलायुर्वेद या ग्रंथात केवळ आयुर्वेदच नव्हे तर बाकीच्या संबंधित इतर शास्त्रांचाही कलेसाठी उपयोग केला आहे. हा सर्व विषय मांडताना लेखकाने आयुर्वेदाचा जितका अभ्यास आवश्यक आहे तितका तर निश्चित केला आहेच; पण लेखक स्वत: गायक संगीतकार आहे आणि त्याचबरोबर अन्य कलांचाही अभ्यासक असल्याने हा विषय अतिशय सूत्रबद्ध, व्यापक आणि सखोल मांडला गेला आहे, याचा प्रथम वाचनातच ठिकठिकाणी प्रत्यय येतो असे एक 'वैद्य' म्हणून माझे प्रामाणिक मत आहे.

आपलं शरीर ही निसर्गाचीच एक छोटी प्रतिकृति आहे. पण नैसर्गिक रीतीशी समतोल राखण्याच्या दृष्टीने पाहिलं तर असं दिसतं की व्यावसायिक कलावंताचं एकूण जीवनच इतकं अनियमित असतं की ते त्याचे सर्व आहार - विहार इ. आयुर्वेदाच्या दृष्टीने स्वास्थ्याच्या विरुद्धच चाललेले असतात. सध्याची

Life Style ही एकूण वेगाने बदलत आहे. प्रदूषणग्रस्त होत आहे. अशा वेळी 'कलायुर्वेद' सारखे विचार जर कलाकाराने वाचले तर आपली प्रकृति कशी आहे? आपण त्यात कुठे बसतो? हा विचार केल्याने कलाकाराचं एकूण वागणंही स्वास्थ्यासाठी बदलू शकेल.

या ग्रंथात ओज आणि प्रतिभा यांविषयी जी मांडणी आहे ती माझ्या मते एक नवीन आणि खूप चांगली कन्सेप्ट आहे. कलाकाराला आपल्यात काय (कलागुण इ.) आहे हे बऱ्याच वेळा माहिती नसतं. तेव्हा अशा मांडणीच्या आधाराने तेही नेमकं त्याला कळून मार्गदर्शन होऊ शकेल. आणि केवळ स्वास्थ्यच नव्हे तर शिक्षण - रियाज यादृष्टीनेही... रियाज आपल्या प्रकृतिप्रमाणे केव्हा, कसा किती करावा याही बाबतीत एक वाद्यवादक म्हणून हे विचार मला महत्त्वाचे वाटतात. म्हणून या बाबतीत ग्रंथात प्रकट झालेले वास्तविक आणि प्रतिवास्तविक - कलाप्रकृति, कलाधर्म इ. सर्व विचार कलाकारांच्या वास्तविक सुप्त गुणांना प्रत्यक्षात आणायला निश्चित मदत करणारे आणि स्वास्थ्याच्याही दृष्टीने मार्गदर्शक ठरु शकतील. कलाकाराच्या व्याधिनिदानासाठी देखील या ग्रंथात सांगितलेला दृष्टिकोन महत्त्वाचा वाटतो आणि या दृष्टीने कलावंतांविषयी निदान व चिकित्सा यांबाबतही एक महत्त्वाची सैद्धान्तिक भर पडली आहे असे वाटते व आता पुढे प्रात्यक्षिक चिकित्सेच्या बाजूनेही काही चांगली भर पडावी अशी अपेक्षा व्यक्त करणं वावगं ठरणार नाही आणि ते तसं होईल याबद्दल मला खात्री आहे.

मी स्वत: एक कलाकार आहे आणि शिक्षणाने आयुर्वेदातला 'वैद्य' म्हणूनही. तेव्हा या ग्रंथातल्या प्रमाणे असा काही एकत्रित विचार होण्याची एक निश्चित गरज कलाक्षेत्रात होती असे काही प्रसंगांच्या निमित्ताने मला पूर्वी जाणवले होते. त्या दृष्टीने एका संगीतकार गायकाने कलाकारांसाठी असा एक अभ्यासपूर्ण शास्त्रीय विषय लिहावा हे मला एक विशेष वाटते.

कलेचा अभ्यास करणारे वैद्य किंवा डॉक्टर्स हेही आता बऱ्याच संख्येने आहेत असं दिसतं. हे लोक आता खास कलाकारांसाठी आपलं वैद्यकीय ज्ञान अशा विषयाच्या आधाराने उपयोगात आणू शकतील. म्हणून आता 'कलायुर्वेद' या ग्रंथाने आयुर्वेदाच्या क्षेत्रात एक नवीन शाखा उदय पावली आहे असं निश्चित म्हणता येतं.

**डॉ. (वैद्य) धनंजय दैठणकर (संतूरवादक)**

आयुर्वेदातील 'वैद्य' आणि हिंदुस्थानी संगीतातील सध्याचे एक सुप्रसिद्ध संतूरवादक.

***''कलावंत हे आपल्या कलाविष्काराने समाजास स्वास्थ्य देत असतात; म्हणजे ते समाजाचे आयुर्वेदच आहेत. म्हणून समाजानेही कलावंतांच्या स्वास्थ्याची काळजी केली पाहिजे. यादृष्टीने कलायुर्वेद या ग्रंथाची मौलिकता आणि महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. इतके दिवस गूढता आणि रहस्यमयतेच्या प्रांतात असणारा कलानिर्मिती - प्रतिभा हा विषय डॉ. दिग्विजय वैद्यांनी अत्यंत सूत्रबद्ध आणि शास्त्रीय मांडणीने वैज्ञानिक प्रयोगक्षमतेच्या प्रांतात आणून सोडला आहे. तसंच हा सर्व विषय मराठीसारख्या भाषेत लिहून त्यांनी मराठी भाषेची सूत्रसक्षमताही सिद्ध केली आहे.''***

**प्रा. रा. ग. जाधव** (माजी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष)

## अभिनंदन !

आयुर्वेदाला सध्या सोनेरी दिवस आले आहेत. आयुर्वेदाने मानवाचा किती व कसा अभ्यास केलेला होता हे आता ५००० वर्षांनी पुढे येऊ लागले आहे. जगातील शास्त्रज्ञ आपापल्या दृष्टिकोनातून आयुर्वेदातील पदर आपापल्या पद्धतीने उलगडू लागले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने (W.H.O.) या शास्त्राची दखल घेतली आहे. पूर्वी अप्रकाशित असलेल्या वृक्षायुर्वेद, अश्वायुर्वेदाची सुद्धा चर्चा सुरू झालेली आहे. संगीत व आयुर्वेदावरसुद्धा प्रयोग यशस्वी झाले आहेत. पण, (संगीत, चित्र, शिल्प, नाट्य, साहित्य अशा) संपूर्ण कलांबरोबर आयुर्वेदाचा संबंध आता प्रस्थापित करणारेही एक 'वैद्य'च आहेत. पण ते आयुर्वेदवैद्य नाहीत, तर संगीत वैद्य आहेत व त्यांनी 'कला-आयुर्वेद (सूत्रसंहिता)' हे पुस्तक स्वत:ला लेखक न म्हणवता 'सार्थक' या समर्पक नावाने सादर केले आहे.

हा विषय त्यांनी निवडून, आयुर्वेदातील एका अप्रकाशित व वेगळ्या विषयाला चालना दिली आहे. मूलत: हा विषय समजायला खूप अवघड आहे. त्यामुळे त्याची मांडणी करताना फार कौशल्याचा वापर आवश्यक होता, तो करण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला आहे. पुस्तकाची रचना करताना आयुर्वेदीय ग्रंथानुसार अध्यायांतून केलेली आहे; त्यामुळे त्याचे स्वरूपही आयुर्वेदीय ग्रंथासारखे वाटते. प्रस्तुत पुस्तकात आयुर्वेदामध्ये संगीतामध्ये स्वराचे उच्चारणासाठी, तसेच नाट्यशास्त्रातही काही अभिप्राय आहेत याचा जसा उल्लेख केला आहे; तसेच संगीतरत्नाकरासारख्या संगीतविषयक ग्रंथाची सुरुवात शरीर - शरीरोत्पत्ती या वैद्यकशास्त्रीय प्रकरणाने झाली आहे, याचाही उल्लेख आहे. संगीतकलादी क्षेत्रामधील मंडळींनी नुसत्या एवढ्या उल्लेखाने समाधानी न होता आयुर्वेदातील दिनचर्या व ऋतुचर्या आपापल्या प्रकृतीप्रमाणे पालन केल्यास व त्याप्रमाणे येणारे अनुभव प्रसिद्ध केल्यास लेखकाने जो अवघड प्रयत्न केला आहे त्याचे चीज होईल; म्हणून आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, आता बदलत्या काळाप्रमाणे कलावंतांसाठी स्वस्थवृत्त हा विषयही यात समाविष्ट व्हावा. मात्र पुस्तकात वापरण्यात येणारी भाषा व वाक्यरचना समजायला थोडी अवघड वाटते. परत परत वाचल्यावरच अर्थ स्पष्ट होतो. पुढील आवृत्तीत याची काळजी घेतली जाईलच. एका सुंदर प्रयत्नाबद्दल लेखकाचे अभिनंदन!

**डॉ. सुहास परचुरे**

अध्यक्ष- राष्ट्रीय शिक्षण मंडळ, पुणे., सदस्य - विद्यापरिषद (पुणे विद्यापीठ)

### *While Reading the Book...*

*To start with, just scan through the book. If something catches your eye, read a bit. You would get an insight of the subject. Thereafter, read notes and explanations in one go. You would get more idea about the subject. Read the preface, and about personalities and acknowledgement of books referred. Now read the list of contents, to know the scope of the subject. You would now focus on whichever chapter that interests you. It would reveal how the subject develops. You could now read the book, chapter by chapter along with notes and explanations. You would realise that the subject is not beyond comprehension (although, it may appear difficult initially). With the help of sutras, the sequence, the terminology, their importance and their applicability is understood, and one comes to know that the book is meant for him.*

**'Kalayurveda' a novel scientific book on an ignored and a difficult subject.**

I have read the book 'Kalayurveda' thoroughly and I have liked it. Such a neglected, overlooked and a tough subject-matter is generally difficult for assimilation. However, the author has painstakingly put across the subject beautifully, in a scientific, logical manner with practical implications backed by sound experience. This book must reach universities, so that expert authorities of this branch can evaluate it. Further, those interested in the subject would get proper direction. While discussing the subject it would be studied in greater depths.

The stated subject matter of this treatise is - 'the effect of health or ill-health of the artists, performing various arts and on those who appreciate and relish it; or its effect on creativity and on the process of appreciation, with reasons and symptoms.' It is quite critical to show that there is a direct relation between 'Samvedanayog' (sensory) with 'Manasvartan' ( psycho response) and that of 'Pran-shaktiviniyog' (life force) with the body. Further, these two 'yogas' do not remain separate entities. The 'Rasa' and 'Anand' (enchantment) sensed are fascinating with respect to the place or time, still it is definitely perceived. This is an invaluable observation made. 'Satvamatma Shariramcha ....... Vedoyam Samprakashita' is a dictum which supports this view.

While an art form is being assimilated the 'Pran shakti' (life force), in the state of sensing aims at the sensitivity, whereas in the state of creativity; combination of assimilation and sensation aims at manifestation in performing arts. This further has a relation with 'Adan-Visarg kal' from 'Prakriti' point of view. This inference too is invaluable. The discussion on comparison of 'Rasas' and their 'Gunas' from an art form and medicine (Vaidyaka) is also noteworthy.

There is a relation of 'Kalatatva' (Time) in both, the creativity of an art form and relishing it, which could be there right from a fraction of a second till days together. In this context, the reference of various seasons ('Rutus') or times (kalamana') for a good or ill health matter. The 'Sannikarshan' and 'Praknitisansthapak function, their effects and finally, 'Vyadhivinishchayadrushti' (diagnosis and treatment) , the 'Vyadhisthana' (the affected organ) and the related discussion is apt and indicates culmination of author's independent and original study and research.

In conclusion, it is beyond any doubt that the author has succeeded in presenting a subject which is an ignored one, a novel but scientific, logically demonstrated and supported with examples. He deserves rich compliments and gratitude.

**- Vaidya Shrinivasshastri Purushottam Hirlekar.**

**Kalayurveda - a New Dawn in the Lives of Artists**

Kalayurveda is a scientific proposition that is close to original Ayurveda but expressed in a different manner.

Till date, discussions have been going on about applying knowledge of medicine in various fields. Very recently, many 'Vaidyas' also have put forward their researched views mainly about the role of Ayurveda in the field of sports medicine.

Apart from sports, we need enjoyment from arts like music, drawing, sculpture, stage, and literature to enrich our lives. With the help of 'Kalayurveda', Dr. Digvijay Vaidya has presented his revolutionary views about the basic concept viz. - Whether there is anything different in Ayurveda in relation to the field of arts? Or whether a different thought could be given to it? I call it revolutionary because, so far scientists and vaidyas from Ayurveda had dealt with 'Prakriti Vichar' consciously, in great details; still no discussion from the point of view of 'Prakriti' of personalities from specific and important fields of arts like music, drawing etc. has been held. A possible reason could be that every doctor-Vaidya may not be well-versed in various art forms and, conversely, artists may not have knowledge of medicine. However, Dr. Digvijay Vaidya is basically a high profile artist of music. Therefore, his knowledge of music is of very high level. Further, he is well-versed with other art - forms as well. He has successfully given a thought to union of knowledge of medicine from Ayurveda and that from the field of fine arts, by studying Ayurveda consciously in details, by himself and also by taking an excellent advantage of Vaidya's family traits through inheritance in the medical field. Besides, he has used association of various doctors and vaidyas from his relations and friend circle. I have been taking an appreciative view of his writing, right from the beginning. Hence I was pleased when 'Kalayurveda' was published.

For many years, I myself have been teaching 'Physiology' in an Ayurvedic college. I also keep going abroad for many projects. Of course, 'Prakriti' (constitution) is the basic subject of my study. Therefore, from the view point of Ayurveda, I appreciate the importance of some distinction revealed in artists with regard to 'Vata', 'Pitta' and 'Kapha', which has been expressed precisely in the book. Dr. Vaidya has conveyed a new interpretation of 'Rasasidhhanta' of dramatics (Natyashastra) from the angle of all arts and accordingly, he has voiced that the distinction of artists based on science of Ayurveda can be definitely called as 'Kalaprakriti'. Hence, it is apt to name these views collectively as 'Kalayurveda'. I am of the view that promotion and maintenance of good health {Swasthyarakshan) and elimination of ill- health {Aswasthyanivaran) of artists as per Ayurvedic practice will be an important social result of this book.

InAyurveda, 'Asatmendryarth Sanyog', 'Pradnyaparadh' and 'Kalparinam' are considered to be the main causes for any disease. By using the same terminology posstively in relation with artists' health, Dr. Vaidya has proved 'Satmendriyarth Sanyog', 'Pradnya -prakash' and 'Kalbodh', as a hypothesis. What we call as an 'Aptitude Test', has also been given a due thought contiguously.

He has raised a significant question in the fifth chapter, which I feel is quite philosophical viz.- " What should be more important for an artist? A good health for living or living for a good health?" He has explained an invaluable theoretical answer to this, in a very simple language and its worth reading.

'Kalayurveda' is an exposition in a new direction, a new concept, and a new base and has definitely contributed to science of Ayurveda. I am confident that with the guidance of 'Kalayurveda', there will be a new dawn in the lives of artists.

**Dr. Rajendra Deshpande.**

### I congratulate Mr. Digvijay 'Vaidya'

I am extremely happy to write about the book 'Kalayurveda', authored by Mr. Digvijay Vaidya. He has handled a totally different subject successfully. He has added a new dimension of 'Ayurveda for artists', to the existing eight aspects of Ayurveda, like 'Kayachikitsa', 'Balrogchikitsa'. An artist is definitely different as a person or a human being from others. Especially for an artist, talent ('Pratibha) is 'Life' ('Prana') or 'Soul' ('Atma'). Therefore, its elucidation from the point of Ayurveda is a challenging task. His endeavour to achieve the same is certainly commendable.

I am myself working as the chief researcher on the research project 'Ayurvediya Triskandhakosh' of Tilak Maharashtra University, since 1989. Up till now 'Lakshankosh' and 'Hetukosh' have since been published and based on these, 'AYUT NIDAN', the 'Ayurvedic Diagnostic Software' has been developed. Information required by artists on subjects like 'Pratibha' (talent), 'Varna' (letters/colours), 'Swara' (Notes) etc. has been compiled in this, from original scriptures written by Charaka, Susruta, and Vagbhatta. This information will be definitely of great use in Kalayurveda. The artists or art-lovers from the Ayurvedic fraternity could help Mr. Digvijay Vaidya. I congratulate Mr. Digvijay Vaidya for justifying his surname 'Vaidya' and wish him success in his work. **Vaidya D. P. Gadgil.**

### Kalayurveda - A Treatise worth studying

Many knowledgeable persons from the fields of Ayurveda and Botany, have a deep attachment for me and for our 'Vaidyak' Research Institute. Many books are sent to us for book-review. Some of them pose a challenge. One of such books on a medical subject authored by Shri. Digvijay Vaidya was sent to us. I read the book repeatedly. I am not an authority in a variety of 'Shastras' and the sixty-four types of fine arts; however, I have had a proud privilege of being with many artists.

'Kalayurveda' is difficult to comprehend at a glance. [It reminds me of the study of 'shlokas' from chapter 16 of 'Ashtanghirday Sutrasthana' regarding effects of Doshas]. Still, all those who want to gain expertise in a diagnostic science like Ayurveda, and administer treatment based on the individuality, must study art medium through such a book. We take every individual as a separate entity; every one has a different frequency, and independent notes (Nadalahari). As there is a restriction on the number of pages of this book, but the extent of the subject is too vast, it may take time to comprehend all aspects; still the book is worth reading and pondering over. The new 'Indriyarth' and the views on 'Sharirkriya' (Physiology) and 'Dhatuvichar' have been nicely presented. For inclination towards fine arts physical strengths (Sharirabala), for presenting it mental ability (Manobala) and for knowledge of arts (Kaladynana) talent {Pratibha) is required. From the diagnosis and treatment point of view, the 6th chapter (Vyadhi-vinishchaya Drushtikona) and the 8th chapter (Vyadhisthan) are worth studying for students of Ayurveda. My best wishes to Dr. Digvijay Vaidya alias 'Sarthak' for his progress in future. **Vaidya P. Y. Vaidya Khadiwale**

**'Kalayurveda' - Important for studies in Medicine and Fine Arts.**

I am indeed pleased to address readers about an excellent book 'Kalayurveda' authored by Dr. Digvijay Vaidya alias 'Sarthak'. While reading the book, one experiences deep knowledge, scolarliness and mastery of the author over beauty of Marathi language.

'Ayurvedaha Ayushyaha Vedaha' - - Ayurveda is an ancient Indian therapy. Ayurveda considers overall physiological and psychological health of human beings. The aim of Ayurveda is to protect and maintain health of a healthy person and to cure sick persons from their ailments.

From this point of view, the treatment given by Dr. Vaidya in this book, while considering an artist at the centre, is effective. It comprises of art forms (Music/ drawing/ sculpture/ stage/ literature) and its presentation and expression by an individual, the physical and psychological changes that occur during the same, changes in 'Vata', 'Pitta' and 'Kapha'; with a detailed discussion on it alongwith a well-studied opinion of the author leaves a deep impact.

It is noteworthy that, while presenting these doctrines, the methodology adopted has been in conformity with traditional Ayurvedic books. Accordingly, the principles have been explained in eight chapters (' Adhyayas') in the form of 'Sutras'. The three assumptions in Kalayurveda stated in the very first chapter clearly explain the extent of the subject.

The concept of 'Prakriti' from Ayurveda, from 'Kalayurvedic' point of view has been defined as 'Sthayirasa-prakriti'. The Ayurvedic knowledge about 'Dosha', 'Saptadhatu', 'Ashaya' (Mansadhara' etc.), 'Kala,' Srotas', 'Marmas', 'Adan-Visargkala', 'Panchamahabhutas', 'Asatmendriyarth Sanyoga', 'Pradnyaparadha', ' Kalaparinam' etc., thought from 'kala' point of view (Music, Sculpture etc.); is entirely new one and even a bit bold. Dr. Vaidya has presented it in a logical and a scientific way and deserves rich compliments.

The theory that 'Pratibha' should be considered as the 'Ninth Dhatu' (For 'Kalaprakriti') after 'Oja' being the eighth one is revolutionary and causes brain storming. In fact all the 'Sutras' make readers think deeply. According to kalayurvedic diagnosis, the unhealthy changes occurring in an artist during creativity is both interesting and astonishing for readers.

Reading this book once is not enough. Its repeated readings will help readers understand the subject in greater depths. This is my own experience. I would request Dr. Vaidya that, while discussing 'Sutras', in this book, if practical examples of artists are quoted, it will facilitate understanding of the subject better.

Dr. Vaidya through this book has brought a new concept for artists and art lovers to follow a new path; for which I am grateful to him. I pray God that this 'Kalayurveda' may reach maximum Vaidyas, Doctors and Artists.

**Dr. (Vaidya) Sanjeevan Divekar.**

## 'Kalayurveda' a New Direction to Medicine

The book 'Kalayurveda' is not only about Ayurveda alone but contains even other relevant sciences, which help fine arts. The author has certainly studied Ayurveda to a desired level to address the subject. Further, he also being a musician, a classical singer and a scholar of other art forms; has introduced the subject deeply, comprehensively and methodically. One can experience this in the first reading itself. This is my frank opinion as a 'Vaidya'.

Our body is a small replica of nature. However, the lifestyle of a professional artist is so irregular that his 'Ahar-Vihar' from Ayurvedic point of view is not in consonance with good health, as it does not go with natural equilibrium.. The present lifestyle is undergoing a rapid change. It is getting affected by pollution. Under these circumstances, if an artist understands ideas in 'Kalayurveda', he may introspect about his health, and he may change his lifestyle for having better health.

In my view, the presentation of 'Oja' and 'Pratibha' is a novel and a fabulous concept. At times a performing artist is not aware of his potential virtues (Kalaguna'). Thus, through such presentations he can perceive it and be guided. It is not only about health alone, he can even get guidance about learning and practising ('Riyaz'). As a player of a musical instrument, I feet that it is important to know that, depending upon one's health, how much and when to practise. Therefore views on 'Vastavika' and 'Prativastavika, Kalaprakriti', 'Kaladharma' expressed in the book would help to bring potential virtues in an artist into reality; that would also help him guide for his good health.

The view about diagnosis in case of an artist, stated in the book is also important. A new important theory about diagnosis and a treatment of an artist has given a new dimension. It will not be wrong to expect that a practical treatment would be a natural outcome of this theory in future.

I am myself an artist and a 'Vaidya' with formal education in Ayurveda. There was a definite need of combining the two, in the field of fine arts, which I had sensed earlier due to some incidences. It is especially noteworthy from that angle that, a professional musician-singer has written on a well-studied scientific subject for artists. It appears that 'Vaidyas' and doctors are in good numbers these days who learn fine arts. They can now apply their knowledge for artists with the help of this subject. Thus the book 'Kalayurveda' has certainly opened a new branch in Ayurveda.

**Dr. Dhananjay Daithankar** (Santoor Player)

*‘‘कलेची साधना करता करता त्याची सिद्धी केव्हा होते? ते कळत नाही. पण हे सर्व घडत असताना बरीच ऊर्जा खर्ची पडत असते. कलाकाराला ती परत मिळवावीच लागते. इथे कलाकाराचा स्वास्थ्याशी संबंध येणं अपरिहार्य आहे आणि यासाठी दुसऱ्या कोणीतरी कलाकाराला सांगण्यापेक्षा एखाद्या कलाकारानेच कलाकारांसाठी कलायुर्वेदासारखा विचार प्रकट करावा हे मला अतिशय महत्त्वाचं वाटतं.’’*

**नृत्य संगीतकार गुरु डॉ. श्रीमती रोहिणी भाटे**

**Ayurveda is an inspiring power for continuous rejuvenation of life**

**Presenting on the occasion of Second World Congress on Ayurveda 2006**

**The first unparalleled, exceptional and revolutionary book written in India;**
**in the field of Arts, Medical Science, Social Health and Culture,**

# ©K a l a y u r v e d a

**Author - Dr. Digvijay Vaidya alias 'Sarthak'**
**Price - Rs. 225/- (Rs. Two hundred and twenty-five only)**

***Concessional price during the period from 05 to 12 November 2006***

**Publisher - Abhinavbharati Kalaprakashan,**
**5, Vrindavan Apts., Ganagote Path, Pune - 411 004.**
**( Maharastra, INDIA )**
**Tele. : 91-020-25673329 Mobile : 9423577029**

### Important Features of the Book :

1) Discovering an experience of arts according to medical science. 2) Perceiving medical science through experience of arts. 3) A note has been taken of several references from chapters of many books and in depth discussions were held with highly knowledgeable and renowned personalities for presenting the subject matter, e.g. - Ayurveda and other medical sciences, 'Vedas and Upanishads', 'Yoga, Sankhya, Vyakarana' etc., for its philosophy, Social sciences, principles of education, culture, research of ancient literature, Indian poetics, scientific views about fine arts, Criticism of arts, practical art forms and their learning- 'Riyaz' (practice) assimilation and presentation and teaching. etc. 4) Through 700 sutras, the subject has been presented extensively in eight chapters to include- 'Kalaprakritilakshan', Kalapariman-Rutucharya-Ayurmanvibhag', Dhatukalpana-Kriyanvay', 'Pratibha-sannikarshan' and 'Kalaprakrutik Bhutadhikya' etc., 'BhutadhikarVibhaki-Pravruttyantar-Vachyasthirata'etc., 'Vyadhivish-chayadrushti', 'Jeevsharirchetana, 'Sarprakriti-Kalaprakriti', and 'Vyadhisthan', 5) The subject has been appreciated as a new step in the modern era by everyone, right from old people to vaidyas of current generation. (Their appreciations are enclosed in the booklet.)

Abhinavbharati Kalaprakashan, Pune-4,
publishes this booklet on 5th November 2006, only for free and private circulation.
© Dr. Digvijay Vaidya alias 'Sarthak'
English version & translation by Lt. Colonel (Retd.) Shrikant Joshi & Mrs. Vineeta Joshi